# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


क्रमांक : १०/एडीएम/पदविका/केंप्रप्र/२०१३/२५४
दिनांक : 2 MAY 2013

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पुणे.

**विषयः- शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेसंबंधी शपथपत्र सादर करणेबाबत...**

**संदर्भः-** १.या संचालनालयाचे पत्र क्र. १०/एडीएम/पदविका/केप्रप्र/२०१३/७४ दि. ३०.१.१३
२.या संचालनालयाचे पत्र क्र.१०/एडीएम/पदविका/केप्रप्र/२०१३/१८४ दि. १९.३.१३
३.या संचालनालयाचे पत्र क्र.१०/एडीएम/पदविका/केप्रप्र/२०१३/२४८ दि. २९.४.२०१३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करिता केंद्रिभुत प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट होण्यासाठी पदविका अभ्यासक्रमातील विनाअनुदानित संस्थेचे शपथपत्र या संचालनालयास सादर केले असुन सदर शपथपत्रात त्रुटी दिसुन आल्या आहेत. ज्या विनाअनुदानित संस्था कॅपमध्ये समाविष्ट असल्याचे कळविलेले आहे, अशा विनाअनुदानित संस्थेपैकी चेअरमन, सचिव व प्राचार्य या तीन व्यक्तीपैकी इतर व्यक्तीनी सहया केल्या असल्याने किंवा तीन व्यक्तीपैकी एखादी व्यक्ती उपस्थित नसल्याने शपथपत्रावर दोनच व्यक्तींच्या सहया केल्या असल्याने त्याबाबत संबंधित संस्थेने त्याबाबत खुलासा या संचालनालयास सादर केला आहे.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, सदर शपथपत्र मान्य करुन केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करण्यासाठी या संचालनालयास सदर केलेला खुलासाबाबत **संस्थेच्या ठरावाची प्रत ही तात्काळ** सोबत पाठविण्यात यावी, अन्यथा उपरोक्त संदर्भाधिन पत्रांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल, सदर बाब आपल्या अधिपत्याखालील विनाअनुदानित संस्थेच्या निदर्शनास आणुन देण्यात यावी. अन्यथा सदर बाबतीतील खुलासा पत्र रद्द समजण्यात येईल.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई.

प्रतः- मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (लक्षवेधः- कार्यासन अधिकारी, तांशि-५, मंत्रालय, मुंबई) यांना माहितीसाठी सविनय सादर.

D:\desk10\N.A\2013-14\undertaking.doc